महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक: एनओटी-३६१८/सीआर-३१/२०१८/तीन दिनांक: २९ ऑगस्ट, २०१९

# घोषणा

**विषय**: महाराष्ट्र गट क सेवा मुख्य परीक्षा २०१९ – अर्ज सादर करण्याबाबत

जाहिरात क्रमांक ०६/२०१९, दिनांक १६ एप्रिल, २०१९ नुसार आयोगामार्फत रविवार, दिनांक १६ जून, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट क सेवा पूर्व परीक्षा २०१९ च्या दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क तसेच कर सहायक व लिपिक-टंकलेखक संवर्गाचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाच्या संकेतस्थळावर महाराष्ट्र गट क सेवा मुख्य परीक्षा २०१९ करीता दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेचे काळजीपूर्वक अवलोकन करुन आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ११ सप्टेंबर, २०१९** पर्यंत अर्ज सादर करणे तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

**३.** आयोगास अर्ज सादर करण्याची तसेच परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण न केल्यास यासंदर्भातील तक्रारींची नंतर दखल घेतली जाणार नाही.

**४.** परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात विहित दिनांकानंतर संपर्क साधल्यास त्याचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

ठिकाण:- मुंबई

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग